# मध्यान्ह

हरि नारायण आपटे

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मध्यान्ह : हरि नारायण आपटे**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये ४००/-

# १. कारस्थानाचा प्रारंभ

आपल्या हातून प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा खून झाला, याबद्दल दादासाहेबांच्या चित्तास यत्किंचित् तरी खेद होत असे कीं नाहीं, याबद्दल कोणत्याही प्रकारचें खात्रीनें विधान करणें मोठें कठीण. साधारणत: अशी समजूत आहे कीं, अपराधी मनुष्याला त्याचें मन नेहमी खात असतें, मग त्याच्या चर्येवर, किंवा बोलण्याचालण्यांत तें दिसून येवो अगर न येवो. दादासाहेब महत्त्वाकांक्षी–पेशवाईचीं वस्त्रें आपल्याला मिळावीं व आपण अधिकार चालवावें हें त्यांस थोरलें नानासाहेब वारल्यापासूनच वाटत होतें; आणि जितके दिवस शक्य तितके दिवस त्यांनी थोरले रावसाहेब लहान लहान म्हणून आपण वाटेल तसा कारभार चालविलाहि. परंतु नानासाहेबाचा मुलगा फार दिवस आपल्या कह्यांत आपल्यास मनस्वीपणानें वागूं देणार नाहीं हें त्यांच्या लवकरच निदर्शनास आलें व पुढें थोडे दिवसांत त्यासंबंधीचा अनुभवहि आला. माधवरावसाहेब फार दूरदर्शी, फार धोरणी, कट्टे निश्चयी आणि खरे शूर, यामुळें राघोबादादांनीं किंवा पक्षीयांनीं रुजत घातलेलें एकहि कारस्थान सफल झालें नाही. सफल होण्याचें तर लांबच राहिलें; परंतु त्यास अंकुर फुटूं लागतांच तें समूळ सबीज असें थोरल्या रावसाहेबांनीं पार नष्ट करून टाकिलें.

सखारामबापू बोकील म्हणजे सगळ्या शहाण्यांतला शहाणा, आणि तो दादासाहेबांचा केवळ उजवा हात. परंतु त्यालासुद्धां माधवरावसाहेबांनीं अटकेंत ठेविलें. अशा अटकेंत असतांहि त्या कारस्थानी पुरुषानें आपल्या कुळंबिणीच्या मार्फत दादासाहेबांकडे चिठीचपाटी पाठवून कारस्थान रचण्याचा घाट घालण्यास कमी केलें नाहीं. परंतु थोरले रावसाहेब त्यांच्याहि वरताण होते, त्यांनी त्यांच्या त्या चिठ्या धरून त्यांच्यासमोर ठेविल्या तेव्हां त्यांची व इतर कारस्थानी गडबड्या लोकांची

खात्री झाली कीं, रावसाहेबांच्या कारकीर्दीत आपणासं कोणत्याहि कारस्थानांत यश येण्याचें नांव नको. मग दादासाहेब, सखारामबापू वगैरे सर्व जागच्या जागीं माधवरावांस शिव्याशाप देत व हातपाय चोळीत बसले. त्यांच्या त्या दुष्ट वासनांमुळेंच काय, रावसाहेबांस ऐन जवानींत मृत्यु आला आणि या ढवळाढवळ करणाऱ्या व महत्त्वाकांक्षी लोकांचे पुन: फावलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, बिचाऱ्या नारायणराव पेशव्याच्या नाहक खून झाला. राघोबांच्या मनाची तृप्ति झाली. त्यांनी आपल्या नांवाची–रघुनाथ बाजीराव–अशी द्वाही फिरवून एकादाचीं पेशवाईचीं वस्त्रें मिळविलीं. हीं वस्त्रें तो अधिकार मिळाल्याकारणानें त्यांच्या मनास सुख अधिक होत होतें, कीं आपण जो भयंकर गुन्हा करून अधिकार संपादिला, त्या गुन्ह्यामुळे त्यांच्या मनाला खेद अधिक होत होता हें कांहींच सांगतां येत नाहीं. त्यांच्या पत्नीस–आनंदींबाईस–मात्र अतोनात आनंद झाला होता, स्वर्ग दीड बोटें राहिला होता हें खास–त्याचप्रमाणें दादासाहेबांच्या चित्तास स्वास्थ्य नव्हतें हेंहि खास. वस्त्रें व शिक्केकट्यार कारकूनाकडून साताऱ्याहून आणविलीं. तीं हातीं घेतली, तीं घेतांना करावयाचा तितका बडेजाव केला, परंतु आपण आतां पुण्यांत रहाणें निर्भय नाहीं, आपल्या मनास स्वस्थता मिळावयाची नाहीं असें त्यांस खचित वाटलें व त्यांनीं हिंदुस्थांत स्वारी करण्यास जाण्याचा विचार केला. इतक्यांत त्यांस असेंहि कळलें कीं, मोंगलाईतलीं आपली ठाणीं आपल्या विरूद्ध असणाऱ्या मुत्सद्द्यांच्या फितुरीमुळें उठलीं असून दिवसानुदिवस फितुरी अधिकाधिक वाढत चाललेली आहे. आपल्या विरूद्ध कारस्थान उठविणाऱ्यांत सखारामबापू आहेत हेंहि त्यांस समजून आलें, त्यामुळे तर त्यास फारच उद्वेग आला. परंतु जेथें लढाई करण्याचा प्रसंग उद्‌भवला तेथें नुसते उद्विग्न होऊन बसण्याचा राघोबादादांचा स्वभावच नव्हे. मोगलाईतलीं ही चळवळ त्यांच्या पथ्यावरच पडली. पुण्याहून निघण्यास त्यांना तें एक कारण झालें. अपराधी मनुष्याचें मन त्याला खात असलें म्हणजे त्याला एके जागीं, निदान जेथें त्यानें गुन्हा केला असेल तेथें तरी स्वस्थ बसवत नाहीं. कोठेंतरी जावें, कांहीतरीं करावें आणि कृतकर्माचा विसर पडावा अशाबद्दल त्याची एकसारखी खटपट असते. रघुनाथरावदादांस आयतीच संधि मिळाली. त्यांनीं लागलीच मोंगलाईत जाऊन फितुरीचा बीमोड केला. जेथून आपला अंमल उठला होता, तेथें तो बसविला, निजामाचाहि थोडासा समाचार घेतला. त्याच्या कसुरीमुळें आपल्यास स्वारी करणें भाग पडलें म्हणून स्वारीच्या खर्चाचा ऐवज त्याच्यापासून उकळला आणि त्या विजयानें

आनंदून जाऊन हिंदुस्थानांत जाण्याच्या बहाण्यानें स्वारी खानदेशांत शिरलीं.

नारायणरावाचा खून करवून आपल्या नांवाची द्वाही फिरविल्याला आतां बरेच दिवसहि झाले आणि असे दिवस गेल्याकारणानें मनाची अस्वस्थताहि कमी होत चालली. इ. स.१७६१ सालीं पानिपतच्या रणभूमीवर गिलच्यांनीं मराठ्यांचा जो पराभव केला, त्याबद्दलचा सूड घेण्याचें व्रत दादासाहेबांनीं घेतलें होतें. व्रत पार पाडण्यास ते निघालें. पाठीमागें आपल्या तर्फेच्या कारभारी मंडळींनी राज्याची व्यवस्था कशी करावीं, कोणी काय करावें वगैरे सर्व सांगून ते निघालें होतें. सखारामबापू, नाना फडणीस, मोरोबादादा, हरिपंत फडके, त्र्यंबकरावमामा पेठे वगैरे मंडळीस त्यांनी नजरकैदेत ठेविलें होतें. त्यांस तसेंच पुण्यांत ठेवून जावें असा त्यांचा पहिला बेत. परंतु आनंदीबाई जशी दुष्ट तशी विलक्षण धोरणीहि होती. ''आपण स्वारी करण्यासाठी गेलों, म्हणजे हे मेले काय उलाढाल्या करतील आणखी काय नाही; यांना एकालासुद्धां पुण्यांत राहूं देऊं नका. आपल्याबरोबर घेऊन चला. यांना मागं ठेवलं, कीं राज्य आपल्या हातचं गेलंच. जीवसुद्धा वांचवायची मारामार. ते चिंतो विठ्ठलाला एक क्षणभरसुद्धां उसंत खाऊं द्यावयाचे नाहींत.'' असा फार दूरदर्शीपणाचा उपदेश तिनें राघोबादादांस केला. आणि त्याला तें तिचें बोलणें सर्वस्वी ग्राह्य वाटून त्यानें सखारामबापू, हरिपंत, नाना व मोरोबा, या चौघांस आपल्या बरोबर स्वारींत नजरकैदी म्हणून बाळगण्याचा निश्चय केला. सगळ्यांची एकदम विटंबना करूं नये, त्यांतला एखादा दुसरा तरी आपल्या बाजूला वळवून घ्यावा, असा त्यांनीं विचार केला. त्यांच्या दृष्टीने जो सगळ्यांत कमी उलाढाल्या दिसला तो त्रिंबकरावमामा पेठे. त्यास त्यांनी फौजेचें काम सांगितलें. त्रिंबकरावमामांच्या हातीं जरीपटका असें. तो वागविण्याचें काम त्यांच्याकडे त्यांनीं तसेंच ठेविलें आणि आपल्या सेनेचा अधिकारहि पाहिल्या प्रमाणें त्यांच्याच हातीं राहूं दिला. अशा थाटानें स्वारी हिंदुस्थास जाण्यास निघाली.

बऱ्हाणपुरास आल्यावर त्यांनी विश्रांति घेण्याच्या हेतूनें आठपंधरा दिवस मुक्काम करण्याचें ठरविलें. हिंदुस्थानाच्या अर्वाचीन इतिहासांत बऱ्हाणपूर हे शहर अनेक प्रसंगामुळे प्रसिद्ध आहे. हल्लीं हे नेमाड जिल्हयांत धरलें जातें. हें मूळ इ. स. १४०० सालीं खानदेशच्या नासीरखान नांवच्या एका नबाबानें दौलताबादच्या शेख बऱ्हाणमुद्दीन या नांवाच्या साधुपुरुषाच्या नावानें बसविलें. या वेळीं खानदेशावर फरुखीवंशाचा अंमल असें. या वंशाच्या वेळचें स्मारक हल्लीं बादशाही किल्ला म्हणून जें स्थान

आहे, तेथें दोन लहान मनोरे आहेत तेवढेंच काय तें. त्या वंशांतल्या बाराव्या पुरुषानें त्या शहराला चांगलेंच नांवारूपास आणलें. जुम्मामशीद म्हणून जी फार सुन्दर मशीद आहे ती त्यानें बांधलीं. इ.स. १६०० सालीं अकबरानें या घराण्याचा नाश करून खानदेश आपल्या साम्राज्यांत गोंविला आणि या शहराला बरेंच चांगलें स्वरूप दिलें. ऐन अकबरींत या शहराचें वर्णन आहे. त्यावरून असें दिसतें कीं, तें त्या काळी शहर फारच मोठें व्यापाराचें ठिकाण होतें. जहांगीर बादशहाच्या वेळीं पूर्वीपेक्षांहि या शहरांचे महत्त्व वाढलें. औरंगजेबाच्या कारकींर्दींत मराठ्यांनी हें शहर एक दोन वेळा लुटून फस्त केलें, निजाम उल्मुल्कनें दिल्ली सोडून दक्षिणेंत राज्य बळकाविलें, तेव्हा प्रथम त्यानें या शहरींच येऊन तळ दिला व त्याचा अंतहि पुढें येथेंच झाला.

आमच्या कथानकाला प्रारंभ होतों, तेव्हां हें शहर मराठ्यांच्या स्वाधीन होतें; तेव्हां राघोबादादांनीं तेथें मुक्काम केला, तो आपल्या घरीं मुक्काम केल्याप्रमाणेंच झाला. तेथें आज मितीस लाल किल्ला म्हणून एक जीर्ण किल्ला पाहण्यास सांपडतो, परंतु आम्ही ज्या काळाबद्दल लिहितों आहोंत त्या काळीं तो इतका जीर्ण नव्हता. नबाबाचे महाल वगैरे ठिकाणें चांगलीं शाबूत होतीं. तटबंदी दुरुस्त केल्याचीं चिन्हें दिसत; कोणीं शत्रूनें मारा केला असता तर लवकर दाद दिली जाणार नाहीं असें स्पष्ट दिसत होतें. या ठिकाणीच दादासाहेबांनी राहण्याची व्यवस्था केली. कांहीं सैन्य किल्ल्यांत व कांहीं बाहेरहि ठेविलें होतें. खुद्द महालांत खास स्वारी व त्यांचा सर्व लवाजमा; आणि बरोबर कैदी म्हणून आणलेलें जुनें मुत्सद्दीमंडळ, इतकी मंडळी होती. सखारामबापू हे आपल्या विरुद्ध आहेत अशा संशयावरून दादासाहेबांनी त्यांस कैदेंत ठेविलें होतें खरें, परंतु इतरांवर जशी सक्त नजर असे, तशी नसे. त्यावर दादासाहेबांची बापूंवर पहिल्यापासून मर्जी, आणि त्यांच्या मुत्सद्दीपणाबद्दल व शहाणपणाबद्दल त्यांस फार खात्री; त्यामुळें कोणती सल्लामसलतीची वेळ आलीं कीं, त्यांनीं बापूंना बोलावून आणून त्यांची मसलत घ्यावयाची असा क्रम असे. बापूंनाहि आपली सुटका व्हावी याबद्दल उत्कट इच्छा होतीच. तेव्हां खासा स्वारीची व आपली जितक्यांदा भेट होईल तितकी इष्टच असे.

दरखेपेस भेट झाली म्हणजे बापूंनी दादासाहेबांस ‘‘आम्ही आपले शत्रू अहों; फितुरी केली आहे, असा आपल्याला संशय आला असून आपण मसलत विचारतां हें कसें? आपण आमच्या फितुरींचे माप तरी पदरी घाला, मग संशय घ्या. आमच्यावरील

संशय जाऊन आपण आम्हास मोकळें केलें, तर आम्हीं आपले शत्रू कीं मित्र हें अनुभवास आणून दाखवूं. रावसाहेबांनीं आम्हांस दादासाहेबांच्या पक्षाचे म्हणून कैदेंत टाकलें, आणि आपण आम्ही आपले शत्रू म्हणून कैदेत ठेवतां आहां. तेव्हां आमच्या नशिबाचा तरी खेळ काय म्हणावा! सगळ्यांत मौज ही कीं, माझा ओढा आपल्याकडे. तो ओढा आहे म्हणून मी आपला सर्वस्वीं नाश करून घेतला, आणखी आपल्याला वाटतें मी आपला दुष्मान. मला खरोखरी दुष्मनाई करायची, तर मला नजरकैदेंत ठेवलेंत तरी काय होणार आहे? पण मला तें कर्तव्य नाहीं. माझा खरा जीव आपल्याकडे. आपण मला कोणत्या वाटेल त्या स्थितींत ठेवलें तरी मी आपलें इमान जागवीन.''

बापूंचें हे बोलणे आजपर्यंत अनेक वेळां झालें होतें; आणि तितक्या गणीक राघोबादादांस असें वाटें कीं, बापू खरोखरीच आपला मित्र असून आपण उगीच त्याला शत्रूप्रमाणें लेखतों व वागवतों. पूर्वीपासून दादासाहेबांचा बापूंवर फार विश्वास, आणि बापू जे करतील तें आपल्या हिताकरितांच करतील अशीं त्यांच्या मनाची खात्री. परंतु नारायणरावांच्या खुनानंतर थोड्याच अवधींत ज्या कांही गोष्टी घडल्या त्या गोष्टींमुळें आनंदीबाईचा बापूंवरील विश्वास पार उडाला. बापू हा दुटप्पी माणूस आहे. कोण्यावेळीं आपला पक्ष सोडून आपल्या घाताला कारण होईल याचा नेम नाहीं असें तिच्या मनानें पक्क घेतलेलें. बाकी सगळे उघडपणें मान कापतील, ते शत्रू बरे, परंतु हा विश्वासांतला विश्वासांतला म्हणून बेसावध ठेवून गळा कापायला कमी करायचा नाहीं असें आनंदीबाईस वाटूं लागले. तेव्हां तिनें आपल्या नवऱ्यास जागृत करून बापूंबद्दल सावधगिरी फार राखायला पाहिजे असें अगदीं निक्षून सांगितले आणि इतरांबरोबर बापूंसहि कैदेंत घालून ठेवण्याचा तिचाच आग्रह होय. या कैदेंत खितपत पडण्यापेक्षां आपण येथून जाणें हेच चांगलें आणि तेंच आपले काम असें बापूंस वाटत होतें व तें साधण्याकरितां हळूच कांहीं तरी युक्ति लढवावयाची असा त्यांनी आपल्या मनाचा निश्चय केला होता. तशांत ती कृत्या आनंदीबाई वेळीं अवेळीं या सर्व मुत्सद्द्यांच्या भेटी घेऊन वाटेल तसे अपमानाचे शब्द बोलत असे. परंतु अजिबात निघून जाण्याचें साधण्यास प्रथम आपल्यावरील कदर थोडीशी कमी करून घेतली पाहिजे हें त्यांस उघड दिसतच होतें.

बऱ्हाणपुरास आल्यावर एकदोन दिवसांनीं रात्रीं दादासाहेबांनीं बापूंना बोलावून आणलें व हिंदुस्थानांत आतां जी मोहीम करावयाची तिजविषयीं कांहीं बोलणें काढलें.

बापूंनीं काय बोलावयाचें तें बोलून शेवटीं म्हटलें, ''दादासाहेब, मी आपला शत्रु नाहीं, अगदीं एकनिष्ठ दास आहें, अशी आपली खात्री होण्याला मीं काय करावें एवढें तरीं सांगा. आपण आम्हांला जन्मभर असें खितपत ठेवलें, तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. म्हणणें असून उपयोग काय? आम्ही आपले बोलून चालून नोकर, पण विनाकारण संशय असूं नये आणखी आपण सांगाल ती नौकरी आमच्याकडून बजावली जावी, एवढेंच आमचें म्हणणें आहे. आपल्याला आम्ही जवळ नको असलों तर आम्हांला परत देशीं जाण्याला परवानगी द्यावी. आणखी आम्ही हमी देतों कीं, आपला गांव सोडून एक कोसभर पलीकडे जाणार नाही. माझें आतां म्हातारपण झालें. ही स्वारीत हिंडण्याची न् फिरण्याची दगदग मला होत नाहीं. या स्वारींत बहुतकरून आम्ही निजधामास जाणार. एकवेळां ही शेंवटची विनंती म्हणून बोलतों आहें. पुन: म्हणून मी स्वत:संबंधानें एक अक्षरसुद्धां काढणार नाहीं. जें होणार असेल तें ब्रह्मदेवालासुद्धां चुकत नाहीं, मग आम्हांला कसें चुकणार आहे.''

या वेळचें बापूंचें बोलणें इतकें कांहीं त्राग्याचें आणि उद्वेगाचें होतें कीं, म्हातारा बोलतो आहे हें अगदीं बरोबर आहे असें दादासाहेबांस खचित वाटलें आणि आतां यास झाली एवढी शिक्षा पुरें, असेंहि पण त्यांच्या मनात आलें. दादासाहेबांच्या मनांत एखादी गोष्ट आली म्हणजे तिची अंमलबजावणीहि तितक्याच तांतडीनें व्हायची; मात्र कोणी त्यांत अडथळा घालतां कामा नये. बापूंच्या सुटकेसंबंधानें बोलणें चाललें, तेव्हां त्यांचें नशीब थोर म्हणून त्या वेळीं आनंदीबाई तेथें हजर नव्हती; ती जर त्या वेळीं तेथें असती, तर सुटकेची तर गोष्ट लांबच, परंतु आपल्या पाठीमागें नवऱ्यास एकीकडे गांठून फसवूं पाहणाऱ्या त्या सखारामबापूंवर तिनें यथास्थित पुष्पांजलि टाकली असती, आणखी त्याच्यावरील नजर अधिक जरबेची केली असती. परंतु आनंदीबाई त्या वेळीं आजारी होती. तिला डोहाळे लागल्याकारणानें अगदीं अंथरूण धरावें लागलें होतें. डोकें वर करणें शक्य नव्हतें. अर्थांतच बापूंस ती चांगली संधि सांपडली. त्यांच्या त्या दिवशींच्या बोलण्याचा दादासाहेबांच्या मनावर परिणामहि झाला. ते लागलीच बापूंस म्हणतात :- ''तुम्हांला स्वदेशीं जाऊं देण्याचा कांहीं आमचा विचार नाहीं, पण तुम्हांला अगदीं जरबेच्या कैदेंत आजपर्यंत ठेवलें आहे. तें कमी करून तुम्हांला लष्करांतल्या लष्करांत वाटेल तिकडे जाण्याची सध्यां मोकळीक ठेवूं. आम्हांला तुमच्या मसलतीची वारंवार जरूरी लागते. तेव्हां तुम्हांला देशीं जाण्याबद्दल

आम्हीं कशी संमति द्यावी? आजपासून तुम्ही वाटेल तिकडे हिंडत जा, आपल्याला अगदींसुद्धां मनाई होणार नाहीं; इतकी सवलत दिल्यामुळें ती मात्र मला काय म्हणेल तें म्हणो.''

या शेवटल्या वाक्यानें बापूंस हसूं आलें. परंतु तें तसेंच आंतल्या आत दाबून ठेवून दादासाहेबांनीं दिलेल्या मोकळिकीबद्दल कृतज्ञतादर्शक अशी त्यांनीं कांहीं वाक्यें उच्चारलीं आणि ते तेथून चालते झाले. इतके दिवस खटपट केल्यासारखें आज आपण थोंडें मोकळें झालों, परंतु त्या अवदसेच्या कानीं हीं गोष्ट जाऊन कांहींतरीं अधिक उणें होण्याच्या आधींच आपण आपला मुक्काम येथून हलवावा, असा त्यांनीं बेत केला, आणि ते त्याच उद्योगास लागले. त्यांनीं दादासाहेबांकडे जाऊन त्यांच्या कानांत अशी विनंती केली कीं, ''आपली आज्ञा असेल तर आपण ज्या चौकडीला कैद करून ठेविलें आहे, त्यांचीं मनें आपल्याला मिळतीं होतील असें करतों. आतां आपले त्यांच्या हातून कांहींसुद्धां अहित होणें शक्य नाहीं हें जाणून आहेत. असें जर आहे तर आपल्याला मिळून आपलीच सेंवा केली तर त्यातच हित आहे हेंहि पण त्यांना दिसूं लागलें आहे. अशा स्थितींत आपण क्षमा करून त्यांच्याकडून सेवा घ्यायला तयार आहां इतकें त्यांना कळलें कीं ते आपल्याला आतां तेव्हांच अनुकूल होतील. मग आपल्याला कशालाच भिण्याचें कारण नाहीं, तेव्हां मी त्यांचें मत आपल्याला अनुकूल करून घेणार आहें. हे आपल्या कानांवर घालून ठेवण्यासाठीं आपल्याकडे आलों. नाहींतर मी करायला जाईन एक आणखी आपल्या कानीं येईल कांहींतरीं भलतेंच. आमचे शत्रु आपल्याला असें देखील सुचवितील कीं मी त्यांच्याकडे जातों, तो आपल्या विरुद्ध खलबतें करायला असें आपल्याला कोणीं सांगितलें असतांहि आपण त्याजवर भरंवसा ठेवणार नाहीं– निदान प्रत्यक्ष पुरावा सांपडल्याखेरीज कांहीं करणार नाहीं, असें आपलें आश्वासन असलें, तर या नादीं लागतों...''

अशा प्रकारें प्रस्तावना करून त्यांनीं दादांच्या मनांत असें भरवून दिलें कीं, दोघें फडणीस व फडके हे पूर्णपणें आपल्याला मिळण्याचा संभव आहे. फितुरी करण्यांत कोणाहि माणसाचें मन वळवून घेण्यांत बापूंची अगदीं कमाल आहे, त्याबद्दल दादासाहेबांची चांगलीच खात्री होती. तेव्हां बापूंनीं ही मसलत काढण्याबरोबर त्यांनीं त्यांस लागलीच रुकार दिला. अर्थातच वर सांगितलेल्या चौघां मुत्सद्द्यांकडे वाटेल त्या वेळी जाण्यायेण्याला आणि हवा तितका वेळ एकान्तांत बसण्याला बापूंस सदर

परवानगी मिळाली; आणि बापूंनीं त्या परवानगीचा जितका फायदा घेणें शक्य तितका घेतला; व तीन किंवा चार दिवसांनींच दादासाहेबांस एकान्ती गाठून सांगितलें कीं, एकंदर विचार पाहतां आतां ह्या मंडळीला आपल्याकडे वळवून घेण्यापासून कांहीं फायदा नाहीं. त्यांच्या मनाची अशीं स्थिति झाली आहे, कीं आज एक म्हणतील आणि उद्यां भलतेंच करतील. आपण आतां स्वारींत जाणार. त्या वेळीं असल्या भयंकर त्रिकुटाचें लटांबर बरोबर नेणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या पायांवर धोंडा पाडून घेण्यासारखें आहे. आपण एखादी मोहीम करण्यास गुंतावें आणखी यांनीं आपल्याच सैन्यांत फितूर करावयाचीं संधि पाहात राहावें यांत मुत्सद्दीपणा कोणता? आतां माझ्याविषयीं आपली खातरजमा झाली आहे. माझा सल्ला आपण घ्याल, तर यांना आपण देशीं परत पाठवावें, मी त्यांच्याबरोबर जातों, लढाईच्या कामांत माझ्या सल्लामसलतीचा उपयोग कांहीं नाहीं. तेथें तलवारीशीं गांठ, ती आपली खंबीर आहे. आपल्याइतका शूर वीर, शस्त्रास्त्रांत प्रवीण, प्रतिविश्वामित्र आहे कोण? आपण मोहिमेवर असतां घर संभाळण्याला माणूस मात्र पाहिजे, तो मी आहे.

माझ्यावर विश्वास ठेवून आपण यांना माझ्याबरोबर देशीं पाठवा. विनाकारण या गुप्त सुऱ्या बरोबर बाळगूं नका. केव्हां कसा दगा करतील याचा नेम नाहीं. पुण्यास गेल्यावर त्यांना पुरून उरणारा मी एकटा आहें. ''झाली एवढी शिक्षा बस आहे. आतां पुन्हा दगलबाजी करूं नका. तुम्हांला एकवार गुन्हा माफ करून देशीं रवाना करतों असें म्हणा. म्हणजें त्यांची त्यांनाच लाज वाटेल, आणखी ते निमूटपणें राहतील. पुण्यास गेलों कीं, ज्याला त्याला त्याच्या वाड्यांत कैद करून ठेवतों. दुसरी एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. या कैदेमुळें, त्या सगळ्यांच्या प्रकृत्या अगदीं बिघडल्या आहेत. एखादा सहज आपल्या मृत्यूनें मेला तरी सुद्धां विनाकारण आपल्याबद्दल लोकांत गैरसमज उत्पन्न होईल. जे जे कांहीं विचार मला सुचले, ते ते आपल्या कानीं घातले आहेत. आपण विचारांत वेळ न दवडतां ताबडतोब माझी मसलत ऐकावीं हें ठीक. याउपर आपण वाटेल तें करण्याला मालकच आहां. अधिक काय बोलायचं आहे.''

बापूंचें हें बोलणें ऐकून दादासाहेबांस तेंहि सगळें खरें वाटलें. विशेषत: दोन गोष्टी फारच मनांत उतरल्या. एक आपण मोहिमेच्या तयारीत असतांना या गुप्त सुऱ्या बाळगण्याची आणि दुसरी एखादा जर प्रकृति बिघडून मेला, तर आपणच त्यास